भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर
ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur
An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ –२७: साप्ताहिक अकरावा पीक सल्ला
## (कालावधी २० ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२६)

## अ. मृदा आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापनाबाबत सर्वसाधारण सूचना

**कापसाचे अधिक उत्पादन मिळण्यासाठी जमिनीचे संतुलित पोषण, योग्य पाणी व्यवस्थापन तसेच कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करून एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.** पीक वाढीच्या सर्व टप्प्यांमध्ये एकात्मिक पीक व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास पिकाची वाढ जोमदार होते, उत्पादन खर्चात बचत होते आणि कीड व रोगांमुळे होणारे संभाव्य नुकसान टाळता येते.

### मृदा आरोग्य व अन्नद्रव्य व्यवस्थापन (एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन- INM)

- **प्रमुख अन्नद्रव्यांच (NPK) संतुलित व्यवस्थापन**:
  जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी पीक फेरपालट, सेंद्रिय खतांचा वापर, शेणखत, कंपोस्ट, हिरवळीचे खत वापर ई. तसेच आच्छादन पिकांचा अवलंब करावा. पेरणीपूर्वी मातीची तपासणी करून त्यानुसार रासायनिक खतांचा संतुलित व शिफारशीनुसार वापर करावा.
- **सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करा:** जस्त, बोरॉन, मँगनीज आणि मॅग्नेशियम यांसारख्या दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास आवश्यकतेनुसार लक्ष्यित पर्णीय फवारणीद्वारे ती दूर करावी.

### रोग व्यवस्थापन (एकात्मिक रोग व्यवस्थापन - आयडीएम)

- **प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करा**:
  जमिनीद्वारे पसरणारे तसेच पर्णभागावरील रोगकारकांचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. यामध्ये शेताची योग्य स्वच्छता राखणे, तसेच बियाणे व मृदा प्रक्रियेसाठी जैविक कीटकनाशके (बायोपेस्टिसाइड्स) आणि जैवखते (बायोफर्टिलायझर्स) यांचा वापर करावा. यामुळे पिकांची सशक्त वाढ होण्यास मदत होते व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्यास सहाय्य होते.
- **पांनांवरील रोगांचे नियंत्रण:**
  हवेतील आर्द्रता जास्त असलेल्या कालावधीत शेताची नियमित पाहणी करावी. रोगाच्या जलद वाढीस व प्रसारास अनुकूल हवामान परिस्थिती असल्यासच शिफारशीनुसार बुरशीनाशकांचा विवेकपूर्ण वापर करावा.

### कीड व्यवस्थापन (एकात्मिक कीड व्यवस्थापन - आयपीएम)

- **नियमित शेत पाहणी करा:** फुलकिडे, मावा, तुडतुडे, लाल कोळी यांसारख्या रसशोषक किडी तसेच बोंडअळींच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवण्यासाठी दर आठवड्याला शेताची नियमित पाहणी करावी.

- **सापळे व जैविक कीडनाशकांचा वापर करा:** हंगामाच्या सुरुवातीपासूनच प्रौढ पतंगांच्या हालचालींचे निरीक्षण व अंडी घालण्याच्या कालावधीचा अंदाज घेण्यासाठी फेरोमोन सापळे लावावेत. तसेच कीड व्यवस्थापनासाठी प्रथम प्राधान्याने सेंद्रिय, नैसर्गिक किंवा वनस्पतीजन्य कीडनाशकांचा वापर करावा.
- **नैसर्गिक शत्रू कीटकांचे संवर्धन करा:** लेडीबर्ड भुंगेरे, लेसविंग आणि बिग-आयड बग यांसारख्या उपयुक्त मित्रकिडींचे संवर्धन करण्यासाठी व्यापक परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांऐवजी निवडक कीटकनाशकांची निवड करावी.

**रासायनिक कीटकनाशकांचा मर्यादित वापर करा:** रासायनिक कीटकनाशकांचा वापर हा शेवटचा पर्याय म्हणूनच करावा किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळी गाठल्यानंतरच लेबलवरील शिफारशीनुसार योग्य रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा.

## बी. स्थानविशिष्ट कृषी सल्ला

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जुलै/ ऑगस्ट | | | | | | | ऑगस्ट | | | | |
| | | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| | धुळे | | | | | | | | 1.7 | 1.2 | 1.5 | 1.8 | 1.4 |
| | नंदुरबार | | | | | | | | 3.2 | 1.8 | 2.5 | 2.1 | 2.4 |
| | जळगाव | 0 | 0 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1.2 | 2 | 4.1 | 3 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0.7 | 0 | 0 | 0 | 1.7 | 1.3 | 1.3 | 1.7 | 2.3 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1.7 | 1.8 | 1.7 | 1.7 | 1.4 |
| | जालना | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1.6 | 1.8 | 1 | 1.9 | 2.6 |
|  | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | | 1.2 | 1.6 | 0.8 | 1.1 | 1.4 |
| | नांदेड | | | | | | | | 5.8 | 5.1 | 2.8 | 2.4 | 5.8 |
| | परभणी | 18.3 | 2.3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2.2 | 3.2 | 1.1 | 1.6 | 3.9 |
| | हिंगोली | | | | | | | | 5.3 | 3.7 | 3.9 | 3 | 5.2 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2.9 | 1.7 | 1.6 | 2.7 | 2 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3.9 | 2.4 | 1.4 | 3 | 2.1 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5.9 | 3.5 | 2.3 | 3.5 | 3.6 |
| | अमरावती | 0 | 0 | 5 | 1 | 20 | 0 | 0 | 6.1 | 4.5 | 1.5 | 4.2 | 4.8 |
| | यवतमाळ | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7.2 | 5.4 | 2.7 | 2.8 | 5.5 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 10 | 7.2 | 1.9 | 3.4 | 8.1 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0 | 14 | 11 | 4 | 7.5 | 12.7 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 25 | 9.6 | 3.6 | 4.4 | 9.8 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | 0.1 to 2.4 मिमी | 2.5 to 15.5 मिमी | 15.6 to 64.4 मिमी | 64.5 to 115.5 मिमी | 115.6 to 204.4 मिमी |
| पावसाची श्रेणी | खूप हलका पाऊस | तुरळक पाऊस | मध्यम स्वरूपाचा पाऊस | मुसळधार पाऊस | अति मुसळधार पाऊस |

**पीक स्थिति:**

**अकोला येथे** पेरणी केलेले कापूस पीक ४३ ते ४८ दिवसांचे असून सध्या पीक शाखिय वाढ अवस्थेत आहे. कोळपणी व निंदणीची कामे करण्यात आली आहेत. तणांचा प्रादुर्भाव असलेल्या शेतांमध्ये तणनाशकांची फवारणीही सुरू आहे. काही शेतांमध्ये विशेषतः लव्हाळा या गवतवर्गीय तणाचा प्रादुर्भाव अधिक दिसून येत असून, त्यासोबत काही रुंद पानांच्या तणांचाही प्रादुर्भाव आढळून येत आहे. काही कापूस शेतांमध्ये कण्हेर या तणाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. उशिरा पेरणी केलेल्या कापूस पिकामध्ये तणांचा प्रादुर्भाव तुलनेने अधिक आहे. काही शेतांमध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून आला असून, तो आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी आहे मात्र तुडतुड्यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा अधिक आढळून आला आहे.

**राहुरी येथे** पेरणीच्या कालावधीनुसार बागायती कापूस पीक ४३ ते ७८ दिवसांचे असून शाखिय वाढ, पाते (स्क्वेअर) लागण्याची, फुले येण्याची व बोंडधारणा सुरू होण्याची अवस्था आहे. सिंचन, कोळपणी, निंदणी, फवारणी तसेच खतांचा वापर करण्याची कामे सुरू आहेत. शेतांमध्ये पार्थेनियम, हरळी, लव्हाळा, दुधी, केना, नागरमोथा, चांदवेल इत्यादी तणांचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. अनेक शेतांमध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा अधिक आढळून आला आहे. मायलोसेरस भुंग्यामुळे कापूस पिकातील १–२ टक्के झाडांचे नुकसान झाले आहे. बोंडअळ्यांचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही. काही ठिकाणी तंबाखू स्ट्रीक विषाणू (TSV) चा प्रादुर्भाव आढळून आला आहे.

**नांदेड येथे** पेरणी केलेले कापूस पीक ३९ ते ६४ दिवसांचे असून पाते लागण्यापासून बोंडधारणा होण्याच्या अवस्थेत आहे. आंतरमशागत, निंदणी, खतांचा वापर तसेच पीक संरक्षणाच्या उपाययोजना सुरू आहेत. शेतांमध्ये डिजिटेरिया, घोडाघास, सेटेरिया यांसारख्या गवतवर्गीय तणांचा, तसेच रुंद पानांच्या तणांमध्ये तांदुळजा, घोळ, चाकवत, कोन्व्हॉल्व्ह्युलस, पार्थेनियम, हिरणखुरी आणि त्रिधारी यांचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. तसेच लव्हाळा व हरळी या तृणवर्गीय तणांचाही प्रादुर्भाव दिसून येत आहे. तुडतुडे व मावा यांचा प्रादुर्भाव आढळून आला असून तो आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) कमी आहे. काही शेतांमध्ये पानांवरील ठिपके रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे.

**पिकसल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांनी ४५–५० दिवसांनी (DAS) जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी कापूस शेतात सऱ्या पाडाव्यात. कापूस पिकामध्ये कोळपणी व निंदणीसारखी आंतरमशागतीची कामे करावीत. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांचा प्रादुर्भाव असलेल्या शेतात क्विझालोफॉप इथिल ५% ईसी @ २ मि.ली./लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरिथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मि.ली./लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथिल ४% एमईसी @ २–२.५ मि.ली./लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची फवारणी करावी. बागायती संकरित कापूस पिकासाठी रासायनिक खताचा पहिला हप्ता म्हणून ४० किलो नत्र (९० किलो युरिया/हेक्टर) आणि जिरायती संकरित/देशी कापूस पिकासाठी ४५ किलो नत्र (९७ किलो युरिया/हेक्टर) वरखत म्हणून द्यावे. मावा, तुडतुडे व फुलकिडे यांसारख्या रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी NSKE ५% + कडुनिंब तेल ५ मि.ली./लिटर किंवा कडुनिंब तेलावर आधारित (३०० किंवा १५०० पीपीएम) कीटकनाशक @ ५ मि.ली./लिटर + १.० ग्रॅम कपडे धुण्याची डिटर्जंट पावडर यांचे द्रावण फवारावे. तसेच कापसाच्या पात्यांवर गुलाबी बोंडअळीच्या मादी पतंगांना अंडी घालण्यापासून परावृत्त करण्यासाठीही या उपायाचा उपयोग होतो. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति एकर २ कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप्स) शेतात लावावेत. किडींच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण करण्यासाठी कापूस शेताचे प्रतिनिधित्व करणारी प्रति एकर २० झाडे निवडून नियमित पाहणी करावी. पराबिल्ट (मर) रोगाची लक्षणे दिसून आल्यास, लक्षणे दिसताच त्वरित सुरुवात करून कॉपर ऑक्सिक्लोराइड ५०% डब्ल्यूपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डब्ल्यूपी @ १०० ग्रॅम +

युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची झाडाच्या मुळाशी आळवणी करावी व एक आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा आळवणी करावी.

राहुरी येथे शेतकऱ्यांनी ६० दिवसांनी (DAS) खताचा दुसरा हप्ता द्यावा. कापूस पीक तणमुक्त ठेवण्यासाठी हाताने कोळपणी व निंदणी करावी किंवा ट्रॅक्टर/बैलचलित अवजारांच्या साहाय्याने आंतरमशागत करावी. तंबाखू स्ट्रिक विषाणू (TSV) व फुलकिड्यांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी शेतातील तसेच बांधावरील पार्थेनियम (काँग्रेस गवत) तण मुळासकट नष्ट करावे. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांसाठी क्विझालोफॉप इथिल ५% ईसी @ २ मि.ली./लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरिथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मि.ली./लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथिल ४% एमईसी @ २-२.५ मि.ली./लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची फवारणी करावी. रसशोषक किडींच्या प्रादुर्भावासाठी शेताची नियमित पाहणी करावी. पिवळे चिकट सापळे लावावेत तसेच घरच्या घरी तयार केलेल्या कडुनिंबाच्या पानांऐवजी कडुनिंब बी अर्क (NSKE) ५% किंवा अ‍ॅझाडिरॅक्टिन १०,००० पीपीएम @ १० मि.ली./१० लिटर पाणी यांची फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या कापूस पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) अधिक असल्यास, फ्लोनिकामिड ५० डबल्युजी @ २ ग्रॅम/१० लिटर पाणी किंवा ब्युप्रोफेझिन २५ एससी @ २० मि.ली./१० लिटर पाणी यांची फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीच्या निरीक्षणासाठी प्रति हेक्टर ५ कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप्स) लावावेत आणि गुलाबी बोंडअळीच्या अळीसह गुलाबी डोमकळी (रोझेट फुले) नियमितपणे गोळा करून नष्ट करावेत, जेणेकरून पुढील पिढीचा प्रादुर्भाव टाळता येईल. सघन लागवड पद्धतीत (HDPS) ९० × १५ से.मी. किंवा जवळची लागवड ९० × ३० से.मी. अंतरावर कापूस लागवड केलेल्या शेतकऱ्यांनी ४०-४५ दिवसांच्या पिकात किंवा पाते लागण्याच्या सुरुवातीच्या अवस्थेत मेपिक्वाट क्लोराइड ५% एएस @ १ मि.ली./लिटर पाणी या प्रमाणात वाढ नियंत्रकाची फवारणी करावी व त्यानंतर १५-२० दिवसांनी दुसरी फवारणी @ १ मि.ली./लिटर पाणी करावी. ९० × ३० से.मी. अंतरावर जवळची लागवड केलेल्या कापूस पिकामध्ये वाढ नियंत्रकाची फवारणी करावयाची नसल्यास, पेरणीनंतर ४५ दिवसांनी मोनोपोडिया (एकल शाखा) काढून टाकाव्यात आणि ७५-८० दिवसांनी शेंडा खुडणी करावी. पराबिल्ट (मर) रोगाची लक्षणे आढळल्यास, लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सिक्लोराइड ५०% डबल्युपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्युपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची झाडाच्या मुळाशी आळवणी करावी व एक आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा ही प्रक्रिया करावी. तंबाखू स्ट्रिक विषाणू (TSV) रोगाचा प्रसार टाळण्यासाठी पिकाची नियमित पाहणी करावी. फुलकिड्यांच्या निरीक्षणासाठी निळे चिकट सापळे @ २०/हेक्टर आणि नियंत्रणासाठी १००/हेक्टर या प्रमाणात लावावेत. टीएसव्ही बाधित झाडे मुळासकट उपटून नष्ट करावीत, जेणेकरून रोगाचा प्रसार रोखता येईल. शेत स्वच्छता काटेकोरपणे पाळावी, विशेषतः कापूस शेतात व आजूबाजूला असलेले पार्थेनियम तण मुळासकट काढून टाकावे आणि फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी शिफारस केलेल्या व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा. फुलकिड्यांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा अधिक असल्यास शिफारशीनुसार योग्य कीटकनाशकांची फवारणी करून नियंत्रण करावे.

नांदेड येथे शेतकऱ्यांनी तण नियंत्रणासाठी आंतरमशागत व निंदणीची कामे करावीत. जमिनीत पुरेसा ओलावा असल्यामुळे हाताने निंदणी करणे शक्य नसल्यास, गवतवर्गीय तणांचा प्रादुर्भाव असलेल्या शेतात क्विझालोफॉप इथिल ५% ईसी @ २ मि.ली./लिटर पाणी, रुंद पानांच्या तणांसाठी पायरिथिओबॅक सोडियम १०% ईसी @ १.५ मि.ली./लिटर पाणी किंवा गवतवर्गीय व रुंद पानांच्या दोन्ही प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६% + क्विझालोफॉप इथिल ४% एमईसी @ २-२.५ मि.ली./लिटर पाणी यापैकी योग्य तणनाशकाची फवारणी करावी. बागायती कापूस पिकाला ६० दिवसांनी नत्र @ ६० किलो/हेक्टर आणि जिरायती कापूस पिकाला ३० दिवसांनी नत्र @ ४८ किलो/हेक्टर याप्रमाणे खताची वरखत मात्रा खत ओळीमध्ये ड्रिलिंग पद्धतीने किंवा आळे पद्धतीने द्यावी. युरियाची वरून पसरून देण्याची पद्धत टाळावी. सघन लागवड पद्धतीत (HDPS) तसेच जवळच्या अंतरावर लागवड केलेल्या बीटी कापूस पिकामध्ये पाते लागण्याच्या अवस्थेत वाढरोधक

मेपिक्वाट क्लोराइड ५% @ ५०० मि.ली./हेक्टर याची फवारणी करावी. ३० दिवसांच्या कापूस पिकामध्ये रसशोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी एनएसकेई ५% ची पर्णीय फवारणी करावी. ६० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा अधिक झाल्यास ब्युप्रोफेझिन २० एससी @ १००० मि.ली./हेक्टर किंवा डायनोटेफ्युरॉन २० एसजी @ १५० ग्रॅम/हेक्टर यांची पर्णीय फवारणी करावी. फुलकिड्यांची संख्या वाढणे व तंबाखू स्ट्रिक विषाणू (TSV) चा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी शेत व शेताचे बांध तणमुक्त ठेवावेत तसेच शेतात व शेताच्या आजूबाजूला पार्थेनियम (काँग्रेस गवत) तण मुळासकट नष्ट करावे. पराबिल्ट (मर) रोगाची लक्षणे आढळल्यास, लक्षणे दिसताच त्वरित कॉपर ऑक्सिक्लोराइड ५०% डबल्युपी @ २५० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५०% डबल्युपी @ १०० ग्रॅम + युरिया २ किलो प्रति १०० लिटर पाणी या द्रावणाची झाडाच्या मुळाशी आळवणी करावी व एक आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा आळवणी करावी. पानांवरील ठिपके व बोंड सड रोगाच्या व्यवस्थापनासाठी पुढीलपैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची १० लिटर पाण्यात शिफारशीनुसार फवारणी करावी: कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्युपी @ ३० ग्रॅम, किंवा प्रोपिकोनाझोल २५% ईसी @ १० मि.ली., किंवा अ‍ॅझॉक्सिस्ट्रोबिन १८.२% डबल्यु/डबल्यु + डिफेनोकोनाझोल ११.४% डबल्यु/डबल्यु एससी @ १० मि.ली., किंवा पायडिफ्ल्युमेटोफेन १३.६% डबल्यु/डबल्यु + प्रोपिकोनाझोल ११.४% डबल्यु/डबल्यु एसई @ १२ मि.ली., किंवा फ्लक्सापायरॉक्साड १६७ ग्रॅम/लिटर + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/लिटर एससी @ ६ मि.ली.

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc., can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from Google Play Store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisories are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.

**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal

**Editing Team:**

Dr. G. T. Behere, Dr. A. S. Tayade, Dr. A. H. Prakash, Dr. S.K. Verma, Dr. S.K. Sain, Dr. Rishi Kumar, Dr. Babasaheb B. Fand, Dr. Ramkrushna GI, Dr. S.P Gawande, Dr. Shivaj Thube, Dr. R.R. Chapke

**Regional language translation**:

**Hindi** : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra
**Punjabi** : Dr Amarpreet Singh
**Tamil** : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan
**Telugu** : Dr L. Rajesh Chaudhary
**Marathi** : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge
**Gujrati** : Dr H R. Desai & Dr Vivek Shah
**Oriya** : Dr B. S. Nayak
**Kannada** : Dr Neelkanth Hiremani